साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar®
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । स्कार्फ
। कॅप्स् एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, अ.नगर.
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १५.१०.२०२६ | अंक नं. १६७ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

## 'दुष्काळाच्या छायेतही' शहरात पाण्याची नासाडी

### नागरिकांच्या बेफिकिरीमुळे रोज हजारो लिटर पाणी रस्त्यावर


(छायाचित्र-धनेश कटारिया)

नगर - पावसाने दडी मारल्यामुळे महाराष्ट्र सरकारने राज्यभरात दुष्काळ जाहीर केला आहे. येत्या काही दिवसांत भीषण परिस्थिती निर्माण होऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा ठाकण्याची दाट शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी तातडीने शहरात १० टक्के पाणीकपात करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असतानाही अहिल्यानगर शहरातील काही नागरिकांना याचे गांभीर्य नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शहरातील विविध भागांमध्ये जेव्हा पिण्याचे पाणी सुटते, त्यावेळी नागरिक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पिण्याचे पाणी वाया घालवत आहेत. सकाळी पाणी सुटल्यानंतर नळांवरून पाणी ओव्हरफ्लो होऊन रस्त्याला तळ्याचे स्वरूप प्राप्त होते. त्यातच अनेक नागरिक स्वतःच्या घरापुढील ओटा, जागा किंवा रस्ता स्वच्छ करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा सर्रास वापर करतात. मंगळवार बाजारासह शहरातील अनेक प्रमुख भागांमध्ये दररोज सकाळी हजारो लिटर पाणी रस्त्यावरून वाहून जाताना दिसते. एकिकडे भविष्यात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येण्याची चिन्हे असताना, दुसरीकडे मात्र चालू पाण्याची नासाडी केली जात आहे. या बाबीकडे बेफिकीर नागरिकांसह महानगरपालिका प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. पाण्याचा हा अपव्यय रोखण्यासाठी महापालिकेने पाणी वाया घालवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

FOR THE MEN
इंडिया गारमेंट्स
पहिल्यांदाच दिवाळी धमाका ऑफर
दिवाळी शॉपिंग आता आणखी स्वस्त
फ्रेश स्टॉक व असंख्य व्हरायटीजवर 10% सुट

10% DISCOUNT
FESTIVE OFFER
ऑफर १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत
सर्व itmes वर सरसकट 10% Discount
तुमच्या आवडीचे फॅशन कलेक्शन आता खास दिवाळी ऑफरसह!
कुर्ता सुट, ब्लेझर, शेरवानी, मोदी जॅकेट, स्वेटर्स, जॅकेट्स, स्वेट शर्ट्स व सर्व विंटर वेअरवर
ब्रॅण्डेड शर्टस, टी-शर्टस, कॉटन ट्राऊझर, जीन्स व सर्व ॲक्सेसरीजवर
*इनरवेअर सोडून
इमारत कंपनी पार्किंग, कोहिनूरच्या मागे, अहिल्यानगर. 7588513820
एम.जी. रोड, कोहिनूर समोर, अहिल्यानगर. 2344449

HAPPY Dussehra
Conquer in style. Lead with warmth

THE Raymond SHOP
Custom Tailoring | Ready to Wear | Accessories
GALAXY
अहिल्यानगर
शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम. जी. रोड, कापडबाजार. ☎ ०२४१-२९९१६६०
शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ☎ ०२४१-३३५३०९२

दिवाळी महासेल.. शनिवार दि.१७ ते रविवार दि.१८/१०/२०२६ फक्त दोनच दिवस..
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस, वेस्टर्न वन पीस, ब्लाऊज भारी, टॉप, ट्राऊजर, कोरियन,खादी व कॉटन पॅण्ट, नाईट पॅण्ट प्लाझो.. रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
पुरुषांसाठी : शर्ट, टी-शर्टस, नाईट पॅण्ट,ट्राउजर, जीन्स २०० रु.काहीही १ व ५०० ला ३
लेडीज : स्मॉल टू 2 X L टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3 X L ते 6 x L रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी पार्टी वेअर ड्रेस व मुलांचे भारी कुर्ता+पायजमा रु.३००/-पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

A GRAND EXHIBITION OF JEWELLERY FOR EVERY STYLE

A Truly Exceptional Jewellery Experience Awaits You!
KAWEDIYA | JEWELLERS |
TIMELESS BEAUTY. LASTING VALUE.
Govind Halwai Chowk, Kapad Ganj, Raviwar Peth, Pune.
Tel.: 020 2447 0417 / 84467 45646
16th OCT • 17th OCT • 18th OCT
Hotel Iris Premiere, Ahilyanagar
genesisads.com

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


## अवास्तव पाणी वापरण्यावर कायदेशीर कारवाई करावी : श्रीनिवास बोज्जा



नगर – महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळ जन्य परिस्थिती निर्माण झाली असताना शहरातील नागरिक पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय करीत असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी श्रीनिवास बोज्जा यांनी महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील उपनगरामध्ये अनेक कॉलनी मध्ये बंगल्या समोर नागरिक मोठ्या प्रमाणात सडा मारून तसेच गाड्या धुवून पाण्याचा अपव्यय करीत असल्याचे प्रखरतेने दिसून येते. या नागरिकांना कोणी पाण्याचा अपव्यय करू नये अशी समज दिली तरी ते ऐकत नाही या करिता महापालिकेनेच जर स्कॉड नेमून या लोकांना पाण्याचा अवास्तव वापर करण्यापासून प्रतिबंद केला तर नक्कीच थोडे का होईना याची मदत दुष्काळजन्य परिस्थीतीत महानगरपालिकेला होईल.

वास्तविकपाहता अनेक महानगरपालिकेने अवास्तव पाणी वापरण्यापासून प्रतिबंद करीत पाण्याचे कनेक्शन वर मीटर लावलेले आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होते, त्याच धर्तीवर महानगरपालिकेने सुद्धा पाण्याचे कनेक्शनला मीटर लावून जितके पाणी वापरले जाईल तितकेच पाण्याचे कर आकारण्यात यावे अशी मागणीही बोज्जा यांनी केली आहे. अनेक नागरिक त्यांच्या मालकीच्या बोअरचाही मोठी प्रमाणात पाण्याचा अनावश्यक वापर करीत असल्याने जमिनीतील भूजल पातळीही खोल गेली असल्याचे सांगण्यात येत आहे. या साठी महानगरपालिकेने याबाबत विचार करून कारवाई करावे व अवास्तव पाणी वापरणाऱ्यांची नावे सांगितल्यास योग्य बक्षीस दिले जाईल अशी योजनाही पालिकेने राबवावी.

## महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळाची परिस्थिती असतानाही मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून सक्तीची कर्जवसुली

### वंचित बहुजन आघाडीतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



योगेश साठे

नगर – महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, शेतीविषयक गंभीर अडचणी, रोजगाराची कमतरता, वाढती महागाई आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील वाढता ताण यामुळे सर्वसामान्य कुटुंबे तीव्र आर्थिक संकटात सापडली आहेत. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक गरीब, शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कामगार व अल्प उत्पन्न गटातील महिलांनी घेतलेल्या मायक्रोफायनान्स कर्जाचे हप्ते भरणे पूर्णपणे अशक्य होत चालले आहे. मात्र, या वास्तवाकडे दुर्लक्ष करून काही मायक्रोफायनान्स कंपन्यांचे कर्मचारी व वसुली प्रतिनिधी महिलांकडे वारंवार जाऊन हप्त्यांसाठी तगादा लावत आहेत. महिलांवर मानसिक दबाव आणणे, त्यांच्याशी अपमानास्पद वर्तन करणे तसेच सक्तीने व बेकायदेशीर वसुली करण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर समोर येत असून या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांच्या मार्गदर्शनानुसार व निर्देशानुसार अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे, अविनाश धनवे, सुशील साळवे, अमर निरभवणे, देविदास भालेराव यांच्या वतीने जिल्हाधिकारींना निवेदन देण्यात आले.

कर्जाची परतफेड करणे ही कर्जदाराची करारानुसार असलेली कायदेशीर जबाबदारी असली, तरी वसुलीच्या नावाखाली कोणत्याही महिलेला धमकावणे, अपमानित करणे, मानसिक त्रास देणे किंवा तिच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचविणे अजिबात सहन केले जाणार नाही. नैसर्गिक आपत्ती, दुष्काळसदृश परिस्थिती आणि रोजगाराच्या अभावामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांशी मानवी दृष्टिकोनातून व्यवहार करणे अपेक्षित आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मायक्रोफायनान्स कर्जविषयक नियामक निर्देशांनुसार कर्जवसुली करताना धमकी देणे, अपमानास्पद भाषा वापरणे, कर्जदाराला सकाळी नऊ पूर्वी किंवा संध्याकाळी सहा नंतर वारंवार फोन करणे, नातेवाईक किंवा परिचित व्यक्तींना त्रास देणे, कर्जदाराचे नाव सार्वजनिक करणे अथवा हिंसेची धमकी देणे यांसारखे सर्व प्रकार कठोर वसुली पद्धती म्हणून मोडतात आणि वित्तीय संस्थांनी अशा नियमांचे पालन करणे बंधनकारक असते.

या बाबींचा सखोल विचार करून आघाडीच्या वतीने प्रशासनासमोर काही महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून महिलांवर होत असलेल्याच्या सक्तीच्या व त्रासदायक कर्जवसुलीच्या सर्व तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात यावी. दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या महिलांकडून धमकी, दबाव, अपमान किंवा अन्य अनुचित पद्धतीने कर्जवसुली होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना लागू कायदे व नियामक निर्देशांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे सक्त निर्देश प्रशासनाने द्यावेत. जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सर्व संबंधित मायक्रोफायनान्स कंपन्यांचे शाखा व्यवस्थापक, कार्यालयप्रमुख, वसुली अधिकारी व वरिष्ठ प्रतिनिधी यांची तातडीने विशेष बैठक बोलावण्यात यावी आणि या बैठकीस आघाडीच्या जिल्हा, शहर व तालुका पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याची संधी देण्यात यावी.

या बैठकीमध्ये महिलांकडून करण्यात येणाऱ्या वसुलीच्या अयोग्य पद्धतींचा आढावा घेऊन धमकी, दबाव, अपमानास्पद वर्तन आणि बेकायदेशीर सक्तीची वसुली तात्काळ थांबविण्याबाबत संबंधित कंपन्यांना स्पष्ट व तडाखेबंद सूचना दिल्या जाव्यात. दुष्काळी परिस्थितीमुळे हप्ते भरण्यात अडचणी येत असलेल्या कर्जदार महिलांच्या प्रकरणांचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन, संबंधित कर्ज करार व लागू नियमांच्या चौकटीत हप्त्यांची पुनर्रचना, मुदतवाढ किंवा इतर उपलब्ध सवलतींबाबत विचार करण्यासाठी कंपन्यांना सक्तीचे निर्देश दिले जावेत. जिल्हा प्रशासनाच्या स्तरावर तक्रार निवारणासाठी स्वतंत्र संपर्क अधिकारी किंवा तक्रार नोंदविण्याची सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून महिलांच्या तक्रारींची नोंद घेऊन त्यावर वेळेत कायदेशीर कार्यवाही होईल. वसुली प्रतिनिधींनी महिलांच्या घरी जाऊन दबाव आणणे, सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, कुटुंबीयांना धमकावणे किंवा नियमबाह्य वर्तन करणे अशा प्रकारांच्या तक्रारी आल्यास त्यांची चौकशी करून दोषींवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.

तसेच, महिलांना त्यांच्या कर्जाची थकबाकी, व्याज, दंड, हप्त्यांची माहिती व तक्रार निवारणाची प्रक्रिया स्पष्टपणे समजावून सांगण्यात येते किंवा नाही, याचीही कसून तपासणी केली जावी. दुष्काळी व आर्थिक संकटग्रस्त भागांतील कर्जदारांच्या अडचणींचा गंभीरपणे विचार करून, संबंधित नियामक संस्था व वित्तीय संस्थांशी समन्वय साधत शासनाने ही कर्जे माफ करून सरकारने स्वतः याचा भरणा करावा, जेणेकरून ग्रामीण भागातील महिलांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळू शकेल. आर्थिक संकटात सापडलेल्या महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा बेकायदेशीर दबाव येऊ नये आणि कर्जवसुलीची प्रक्रिया पूर्णपणे कायदेशीर, पारदर्शक व मानवी दृष्टिकोनातून पार पाडावी, यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे.

प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने दखल घेऊन तातडीने बैठक आयोजित करावी आणि संबंधित सर्व यंत्रणांना आवश्यक त्या कठोर सूचना द्याव्यात, अन्यथा पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने जनआंदोलन व पुढील सर्व प्रशासकीय कायदेशीर कारवाई तीव्र केली जाईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे. याप्रसंगी जिल्हा, तालुका, शहर आणि विविध विंगचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.






## महापालिका पेन्शनर्सना दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक देण्याचे आश्वासन; आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी सकारात्मक चर्चा; ‘धरणे आंदोलन’ स्थगित

नगर – दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारात सुरू असलेल्या पेन्शनर्सच्या धरणे आंदोलनाला अखेर यश आले आहे. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या शिष्टमंडळाने १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन चर्चा केली. या चर्चेदरम्यान आयुक्तांनी पेन्शनर्सच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत दिवाळीपूर्वी पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संघटनेच्या वतीने सुरू असलेले धरणे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांनी दिली.

महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक देण्यांचा प्रश्न अनेक दिवसांपासून चर्चेत होता. पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम आणि सहाव्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप मिळाले नसल्याने पेन्शनर्समध्ये नाराजी होती. या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने मंगळवारपासून महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी हलगीच्या निनादात आंदोलन करून पेन्शनर्सनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. दिवाळीचा सण जवळ आला असताना हक्काची आर्थिक देणी मिळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सायंकाळी संघटनेच्या शिष्टमंडळाची आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी बैठक झाली. या बैठकीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक देण्यांसह विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक आणि सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते मिळावेत, ही मागणी मांडली. चर्चेसाठी संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, रंगनाथ गावडे, मधुकर खताळ, दिलीप पाठक, ज्ञानेश्वर धिरडे, अंकुश कोतकर, अपाक शेख उपस्थित होते.

या चर्चेदरम्यान आयुक्तांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत दिवाळीपूर्वी पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित आर्थिक देण्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

पाचव्या वेतन आयोगाच्या थकीत फरकासोबतच सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप मिळाले नसल्याचा मुद्दा आंदोलनादरम्यान प्रकर्षाने उपस्थित करण्यात आला. या प्रलंबित हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम प्रशासनाने कोणताही विलंब न करता अदा करावी, अशी मागणीही संघटनेने केली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी प्रदीर्घ काळ सेवा बजावल्यानंतर नियमानुसार मिळणाऱ्या आर्थिक लाभांसाठी वारंवार पाठपुरावा करावा लागणे, ही बाब चिंताजनक असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. प्रलंबित रकमेबाबत प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी आणि पेन्शनर्सना त्यांच्या हक्काची रक्कम वेळेत मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी भूमिका संघटनेने मांडली.

दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर जीवनावश्यक गरजांसाठी आर्थिक तरतूद करावी लागते. अशा परिस्थितीत वेतन आयोगाचा थकीत फरक आणि प्रलंबित हप्ते मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर केलेल्या सेवेच्या मोबदल्यात नियमानुसार मिळणारी देणी वेळेवर मिळणे आवश्यक आहे. मात्र, हक्काची रक्कम मिळवण्यासाठी सणासुदीच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याने पेन्शनर्सनी नाराजी व्यक्त केली. दिवाळीपूर्वी प्रलंबित रक्कम मिळाल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सण साजरा करण्यासाठी मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

महापालिका पेन्शनर्सचे प्रश्न सुटण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाठिंबा देऊन केलेल्या सहकार्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले आहे.

या आंदोलनात कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, संजीव परशरामी, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर. बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, रंजना भोसले, लता महाले, मीरा चव्हाण, अशोक विधाटे, रफिक शेख, संजय दगडे, मिलिंद नराल, जगदीश घोरपडे, बबन आढाव, राजू मेढे, बाळासाहेब नलगे, सुधाकर काशीद, हुसेन शेख, सादिक शेख, दत्तात्रय फडके आदींसह संघटनेचे पदाधिकारी व पेन्शनर्स यांनी सहभाग नोंदवला.

## अहिल्यानगर तालुक्यातील सर्व गांवांमध्ये २१ ऑक्टोबरला चारा टंचाईवर मात करण्यासाठी ‘ग्रामसभांचे’ आयोजन

### VBG-RAMG योजनेंतर्गत चारा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे तालुका प्रशासनाचे आवाहन

नगर – आगामी काळात चारा टंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन अहिल्यानगर (ग्रामीण) तालुक्यात चारा लागवडीचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) (VBG-RAMG) योजनेंतर्गत चारा लागवडीची कामे हाती घेण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचा निर्णय तालुका प्रशासनाने घेतला आहे. या अनुषंगाने २१ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असून, या ग्रामसभांना चारा लागवडीसाठी इच्छुक वैयक्तिक शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

चारा टंचाईच्या संभाव्य परिस्थितीचा विचार करून त्यावर वेळीच उपाययोजना करण्यासाठी १२ ऑक्टोबर रोजी तहसीलदार, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी, सहाय्यक गट विकास अधिकारी तसेच सर्व मंडळाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आगामी काळातील चारा टंचाईची शक्यता लक्षात घेऊन चारा लागवडीसाठी आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात आला. विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) (VBG-RAMG) योजनेंतर्गत चारा लागवडीची कामे करण्यास इच्छुक असलेल्या वैयक्तिक शेतकऱ्यांना या योजनेची माहिती मिळावी, तसेच त्यांना चारा लागवडीच्या कामांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने गावपातळीवर जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार, २१ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे. या ग्रामसभांच्या माध्यमातून VBG-RAMG योजनेंतर्गत चारा लागवडीच्या कामांची माहिती देण्यात येणार असून, या उपक्रमाबाबत व्यापक प्रसिद्धी करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## डॉ. सुदर्शन धस यांच्या कथा संग्रहाला मराठी बालकुमार साहित्य सभेचा पुरस्कार



नगर – येथील साहित्यिक डॉ.सुदर्शन धस यांच्या नकली सिंहाची धमाल या बालकथा संग्रहाला मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर यांचा २०२५ या वर्षाचा साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

डॉ. सुदर्शन धस हे रयत शिक्षण संस्थेमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून विविध वृत्तपत्रे, मासिके व दिवाळी अंक यामधून त्यांचे विविधांगी लेखन सातत्याने प्रकाशित झालेले आहे. यापूर्वी त्यांच्या दोन पुस्तकांना राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार लाभलेले आहेत.

आनंदाने गाऊया या त्यांच्या विद्यार्थीप्रिय बालकविता संग्रहाची महाराष्ट्र शासन – ग्रंथ निवड समितीमार्फत शासनमान्य ग्रंथांच्या यादीत शिफारस करण्यात आलेली आहे.

## कमलाबाई कस्तुरी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – झारेकर गल्ली येथील रहिवासी कमलाबाई रामदास कस्तुरी (वय ७५) यांचे १५ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गणेश व नागराज कस्तुरी यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची तिसरी यादी जाहीर

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत लाभ मिळालेल्या शेतकऱ्याची तिसरी यादी प्रसिध्द झाली असून या यादीमध्ये जिल्ह्यातील ४ हजार ४१५ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पहिल्या दोन यादी मध्ये १ लाख ४२ हजार ४४१ शेतकऱ्यांचा समावेश असून आजपर्यत एकूण १ लाख ४६ हजार ८५६ शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणाची यादी उपलब्ध झाली असून १ लाख ३३ हजार ५०५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सांगितले आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील आजपर्यत एकूण १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ११४ कोटी रुपये जमा झालेले आहेत.

ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मंगेश सुरवसे यांनी केले आहे.



सर्जेपुऱ्यातील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित 'माता की चौकी' कार्यक्रमात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

# 'जय माता दी'च्या जयघोषाने दुमदुमले सर्जेपुऱ्यातील राधा-कृष्ण मंदिर

### माता की चौकीत भक्तीचा जागर!; महाकालचे तांडव, महाकालीचा अवतार अन् राक्षसवधाचा जिवंत देखावा; पंजाबी ढोलच्या तालावर महिलांचा रास गरबा

नगर - सर्जेपुऱ्यातील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'माता की चौकी' कार्यक्रमात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. देवीच्या भक्तिगीतांनी मंत्रमुग्ध झालेले भाविक, महाकालचे तांडव नृत्य, महाकाली देवीचे आगमन आणि राक्षसवधाचा जिवंत देखावा, तसेच पंजाबी ढोलच्या तालावर रंगलेला रास गरबा अशा विविध कार्यक्रमांनी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. शीख आणि पंजाबी समाजबांधवांसह महिला भाविकांनी उपस्थित राहून देवीचा जागर केला.



**सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचा सामाजिक पुरस्काराने गौरव**

दहा वर्षांपासून सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून उपेक्षित व दुर्लक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकांना आधार देण्याचे सामाजिक कार्य सुरू आहे. या कार्याची दखल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने घेतली असून, संस्थेच्या कार्याची नोंद करण्यात आली आहे. या कार्याबद्दल संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय आणि सदस्यांचा राधा-कृष्ण मंदिर ट्रस्टतर्फे सामाजिक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

माता की चौकीच्या कार्यक्रमात महाकालचे तांडव नृत्य, महाकाली देवीचे आगमन आणि राक्षसवधाचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. या देखाव्याने उपस्थित भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या या सादरीकरणाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी देवीच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या त्रिशा ओबेरॉय हिचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच भाविकांनी 'जय माता दी'चा एकच जयघोष केला. देवीच्या रूपातील तिच्या देखण्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

शिर्डी येथील नवदुर्गा जागरण ग्रुपच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात दिलप्रीतकौर बतरा यांनी देवीची विविध भक्तिगीते सादर केली. देवीच्या एकाहून एक सरस भक्तिगीतांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या भक्तिगीतांमध्ये भाविक तल्लीन झाले होते. देवीच्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमात भाविकांनी भक्तिगीतांचा मनमुराद आनंद लुटला. देवीच्या जयघोषाने वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागातून साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने नवरात्रोत्सवाचा उत्साह अधिकच वाढविला.

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात पंजाबी ढोलच्या ठेक्यावर महिलांनी रास गरबा नृत्य सादर केले. ढोलच्या तालावर थिरकणाऱ्या महिलांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. भक्तिगीतांचा गजर, ढोलचा निनाद आणि देवीचा जयजयकार यामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारून गेला होता. महिलांसह उपस्थित भाविकांनी या सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला.

पंजाबी सनातन धर्मसभेचे ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता आणि सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे यजमान संजय धुप्पड परिवाराच्या वतीने जय धुप्पड आणि गायत्री धुप्पड यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. आरतीनंतर भाविकांना भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. भंडाऱ्याने या भक्तिमय सोहळ्याची सांगता झाली.

राधा-कृष्ण मंदिरातील नवरात्रोत्सवाची सांगता १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीत पूर्णाहुती यज्ञाने होणार आहे. त्यानंतर २० ऑक्टोबर रोजी समाजबांधवांच्या उपस्थितीत दसरा सण साजरा करण्यात येणार आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## चित्त स्थिर ठेवण्याची जरुरी

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स




एकदा स्वामी विवेकानंदांकडे एक तरुण आला. मोठ्या उद्योगसमूहाचा तो मालक होता. वडील वारले म्हणून त्याच्या खांद्यावर त्या समूहाचा भार पडला होता. तो भांबावून गेला होता. जुने वयस्कर व्यवस्थापक, अधिकारी व नोकर विश्वासार्ह नाहीत, असे त्याला वाटू लागले होते. तो अस्वस्थ झाला होता. स्वामीजींना त्याने आपली व्यथा सांगितली. उद्योगसमूहातले अधिकारी विश्वासार्ह वाटत नाहीत, पण त्यांना काढायचं तरी कसं? वय, अनुभव आणि कौशल्य आहे त्यांच्या ठायी. मला तुच्छ लेखतात ते त्यापायी.

स्वामीजी बोलले नाहीत. उठले व तळ्याकडे निघाले. त्या तरुणालाही त्यांनी सोबत घेतले. तरुणाला उत्तर हवे होते. उद्योगसमूहातील अधिकाऱ्यांना कसे सांभाळायचे? त्याला ते समजत नव्हते. स्वामीजी तळ्याकाठी बसले. डोक्यावर सूर्य तळपत होता. त्याचे प्रतिबिंब पाण्यात पडले होते. स्वामीजींच्या हाती लांब दंड होता. स्वामीजी काही बोलतील म्हणून तो तरुण मोठ्या अपेक्षेने स्वामीजींकडे पाहत होता. स्वामीजींनी तेवढ्यात हातातला दंड तळ्यातल्या पाण्यात ढवळला. पाणी खूप हलले. लाटा उसळल्या. स्वामीजी एकदम ओरडले, अरे पाहा! त्या पाण्यात सूर्य कसा चलबिचल झालाय. असा वेडावकडा दिसतोय. कसा खाली वर, खाली वर उसळतोय. क्षणापूर्वी कसा स्थिर होता? गोल दिसत होता. त्याचे तेज सर्वदूर फाकलेलं होतं. पण

आता.......

तरुण म्हणाला, नाही, नाही. स्वामीजी! आता काही बिघडलं नाही. तुम्ही पाण्यात दंड फिरवला. पाणी अस्थिर झालं. चंचल लाटा उसळू लागल्या त्याबरोबर सूर्याची प्रतिमा वेडीवाकडी दिसू लागली.

स्वामीजी म्हणाले, पाणी हलले. नाना प्रकारे उसळले. मग त्यात पडलेली सुर्याची प्रतिमादेखील हलली. दुभंगली. वेडीवाकडी भासली. पण लगेच पाणी स्थिर झाले. सूर्य एकजिनसी दिसू लागला. तसेच माणसांच्या बुद्धीचे, चित्ताचे. बुद्धी अनेक प्रकारे भ्रमित झाली. कारण चित्ताची स्थिरता ढळली. मग मनात कितीतरी विकल्प उठले. मन चिंतित झाले. त्या एकाबद्दल, अनेकांनी शंकानी ग्रासले. भेदभावनांनी मन भारले, की अस्वस्थेतला आमंत्रण मिळते.

स्वामीजींनी हा श्लोक त्या तरुणाला असाच समजावून सांगितला. तुझं चित्त स्थिर ठेव. बुद्धीला त्रिकल्पविरहित विचार करू दे. शंकाकुंल आणि हे की ते असा संभ्रम नसू दे. अधिकारी अविश्वासार्ह जाणवतात, कारण तुझं मन विश्वासाची कासच धरू शकत नाही. आधी तुझं मन स्थिर कर. अस्थिर मनात अधिकाऱ्यांची स्थिर प्रतिमा कशी उमटेल? पाणी अस्थिर होतं, तोवर सूर्याची प्रतिमा वेडीवाकडी जाणवत होती ना? आणखी एक कर. तुझ्यातला न्यूनगंड काढून टाक. वयोवृद्ध अनुभवी अधिकारी आणि नवखा तू, यांत भेदभाव करशील. तर अशा अस्वस्थेलाच जागा करून देशील. असे ते म्हणाले. तरुण उमजला. सोत्साह परतला.

– किशोर गांधी

# तिळवण तेली समाजाच्या दाळ मंडईतील मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त देवीची विविध रूपे साकार

नगर - तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त दाळ मंडई येथील श्री संताजी भवन येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात देवीची विविध आकर्षक रूपे साकारण्यात येत आहेत. नवरात्रोत्सवाच्या प्रत्येक दिवशी देवीची वेगवेगळ्या स्वरूपांत सजावट केली जात असून, या देखण्या रूपांचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची गर्दी होत आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने दररोज देवीच्या रूपात वैविध्य जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामध्ये हत्तीवर विराजमान देवी, कमळावर विराजमान देवी, चंद्रावर विराजमान देवी आणि मोरावर विराजमान देवी अशा विविध रूपांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. तसेच तुळजापूर येथील देवीच्या स्वरूपावर आधारित विशेष सजावटही करण्यात आली आहे. प्रत्येक दिवशी देवीचे वेगळे रूप भाविकांना पाहायला मिळत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्सुकता दिसून येत आहे. देवीची आकर्षक सजावट, सुबक मांडणी आणि धार्मिक वातावरण यामुळे मंदिरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असून, सजावटीचे कौतुकही केले जात आहे.

**हत्तीवर, कमळावर, चंद्रावर आणि मोरावर विराजमान देवीच्या आकर्षक सजावट**



तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळ मंडईतील मंदिरात नवरात्रउत्सवानिमित्त देवीची विविध रूपे साकारण्यात आली.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्या अध्यक्ष सौ. नीता लोखंडे म्हणाल्या की, नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजातील एकोपा, श्रद्धा आणि संस्कृती जपण्याची संधी आहे. देवीची विविध रूपे साकारण्यामागे भाविकांना दररोज काहीतरी वेगळे आणि आकर्षक पाहायला मिळावे, हा उद्देश आहे. समाजातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. धार्मिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, समाजातील बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाचा विकास साधणे, हे ट्रस्टचे प्रमुख ध्येय आहे. भाविकांचा मिळणारा प्रतिसाद आम्हाला अधिक चांगले उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा देतो. 'समाजाचा विकास हा एकच ध्यास' या विचारातून ट्रस्ट यापुढेही विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहील.

या नवरात्रोत्सवाच्या आयोजनासाठी ट्रस्टच्या उपाध्यक्षा सौ. शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, दत्तात्रय डोळसे आणि गोकुळ कोटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# भिंगारमध्ये रंगला शाहिरांचा कलगीतुऱ्याचा मेळा

### ३५० वर्षांची लोककलेची परंपरा कायम; सवाल-जवाब, गौळणी, पोवाडे आणि काव्यात्मक सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध; सरपंच गल्लीमध्ये शाहीरांची मांदियाळी

नगर - शारदीय नवरात्र उत्सव आणि आई जगदंबेच्या पालखी-पलंग भेटीच्या निमित्ताने भिंगार येथील सरपण गल्लीमध्ये पारंपारिक कलगीतुऱ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. तब्बल ३५० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या लोककला सोहळ्यात जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील दिग्गज शाहिरांनी सहभाग घेतला. शाहिरांचे सवाल-जवाब, काव्यात्मक सादरीकरण, गौळणी आणि पोवाड्यांच्या रंगतदार आविष्काराने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.



शारदीय नवरात्र उत्सव आणि आई जगदंबेच्या पालखी-पलंग भेटीच्या निमित्ताने भिंगार येथील सरपण गल्लीमध्ये पारंपारिक कलगीतुऱ्याच्या कार्यक्रमात जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेरील दिग्गज शाहिरांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. शितलताई संग्राम जगताप, भिंगार कॅम्पच्या पोलीस निरीक्षक सौ. तेजश्री थोरात आणि समाजकल्याण अधिकारी सौ. प्रियंका जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष तथा भिंगार कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डिले यांनी स्वागत केले. रात्री साडेआठ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात सुमारे १७० शाहिरांचा सहभाग असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. पारंपरिक कलगीतुऱ्यातील सवाल-जवाबांची रंगत, शब्दांची अचूक फेक, काव्यात्मक शैली आणि लोककलेतील वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्याला लोककलेवर प्रेम करणाऱ्या रसिकांनी उपस्थिती लावली.

या कार्यक्रमात कलगीवाले शाहीर म्हणून राजेंद्र निमसे, पाराजी पानसंबळ, रामभाऊ सरोदे, विश्वनाथ गुगुळे, बाळासाहेब बोरुडे, एकनाथ पवार आदी शाहिरांनी सहभाग घेतला. तर तुरेवाले शाहीर म्हणून निजामभाई शेख, कान्हू सुंबे, विठ्ठल भांड, शिवाजीराव ठाणगे, सुभाषराव कावरे, दत्तात्रय झावरे, लक्ष्मण भामरे, शांताराम किंकर, शिवाजीराव वाणी, अण्णासाहेब चौरे, गणेशराव लोंढे, साहेबराव किंकर, जालिंदर भांड, लहुदादा कदम आदी शाहिरांनी कलाविष्कारातून रसिकांची दाद मिळवली.

शाहिरांनी गौळणी, पोवाडे, कविता आणि पारंपरिक सवाल-जवाबांच्या माध्यमातून लोककलेचे विविध पैलू सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून मराठी लोकपरंपरेतील शब्दवैभव, काव्यप्रतिभा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले.

यावेळी भाऊसाहेब कर्डिले, रुपेश भंडारी, रावसाहेब कोकणे, राजू अत्तार, महेश झोडगे, रवी फल्ले, दीपक लिपाणे, अक्षय नागापुरे, राजू परदेशी, आदित्य दिवटे, आसलकर मामा, संदीप फटांगरे, सार्थक साठे, मयंक कर्डिले, कृष्णा फटांगरे आदिसह नागरिकांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले.



शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान अहिल्यानगरतर्फे शहरात दुर्गामाता दौड काढण्यात येत आहे.

# पाश्चात्य संस्कृतीचं अंधानूकरण थांबवा : ठाणगे बापु

नगर - भारतीय संस्कृतीमध्ये दिव्य परंपरा चालली ती रूढी आहेत तरीही आमच्या कुटुंबांमध्ये पाश्चात्य संबोधने व वेशभूषा चालीरीती परंपरा यांचा पगडा पाहायला मिळतो हे अंधानूकरण तत्काळ थांबवा पोस्ट खरकटक किती दिवस खाणार असे उद्गार बापू ठाणगे यांनी काढले.

शारदीय नवरात्रौ उत्सवानिमित्त रोज नव्या वसाहतीतील देवी मातेच्या दर्शनासाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान अहिल्यानगर तर्फे दुर्गामाता दौड काढण्यात येत आहे. सावेडी उपनगरातील प्रेमदान हडको वसाहतीतील तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी दुर्गामाता दौड काढण्यात आली. त्यावेळी उपस्थित देवी भक्त व धारकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला.

ठाणगे पुढे म्हणाले, प्रत्येक कुटुंबांमध्ये प्रतिष्ठेचे लक्षण म्हणून आई-बाबांची जागा मम्मी- पप्पा- डॅडने घेतली आहे. अशीच अवस्था आमच्या दैनंदिन जीवनातील भाषेवरही झालेले दिसते. तरुणांवर व कुटुंबातील बालकांवर असे संस्कार कळत नकळत केले जात आहेत.

हॅपी दसरा, दिवाळी, नवरात्र हे तात्काळ हद्दपार करा. बर्थडे नाही तर वाढदिवस साजरे करा असे त्यांनी आवाहन केले. कुटुंबातील महिलांनी आपल्या मुलांना अर्थात नवीन पिढीला हे संस्काराचे देण दिलं नाही तर आपली दिव्य परंपरा टिकणार कशी ? असा प्रश्न त्यांनी विचारला.

धर्मवीर चौकातील देवी मातेसमोर ध्येयमंत्र व प्रेरणा मंत्र म्हणत दुर्गामाता दौड निघाली प्रेमदान हडको वसाहतीतील सर्व कुटुंबियांना सामावून घेत शौर्य गीतांचे गायन करत तुळजाभवानी माता मंदिरामध्ये तुळजाभवानी माता, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांना साक्ष ठेवून शपथ घेऊन तिची सांगता करण्यात आली.



शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त आदिशक्तीचा शक्तीचा अहिल्यानगर महापालिकेतील महिला कर्मचारी. (छायाचित्र - लहू दळवी)

# भगवान श्री अय्यप्पा मंदिरात १७ ऑक्टोबरला विद्यार्थ्यांसाठी सरस्वतीदेवीच्या पूजेचे आयोजन

नगर - नवरात्रोत्सवानिमित्त भगवान श्री अय्यप्पा मंदिरात विद्यार्थ्यांसाठी १७ ऑक्टोबरला सरस्वती देवीच्या विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. नगरच्या श्री अय्यप्पा मंदिरात सरस्वती देवीचे मंदिर आहे. येथे सायंकाळी ७ वाजता या पूजेचे आयोजन करण्यात आले आहे, असे अशी माहिती श्री आय्यप्पा सेवा समितीच्या वतीने देण्यात आली.



नवरात्रोत्सवात सरस्वती देवीच्या पूजनास अत्यंत महत्व आहे. विद्यार्थ्यांमध्ये विद्या वाढावी, विद्येची देवता सरस्वतीदेवीची कृपा व्हावी, यासाठीच अय्यप्पा सेवा समितीच्या वतीने या विशेष पूजेचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले आहे.

या सोहळ्यास विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन देवी सरस्वतीचा आशीर्वाद प्राप्त करावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९९२२००४७७७ येथे संपर्क साधावा.

# नवरात्रोत्सवानिमित्त ललिता सहस्रनाम कुंकुमार्चन कार्यक्रम

### श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्टतर्फे ललिता पंचमीचे औचित्य साधून रंगला धार्मिक सोहळा, देवीच्या नामस्मरणाने परिसरात भक्तिमय

नगर - श्री रामदेव भक्त मंडळ (ट्रस्ट) आयोजित शारदीय नवरात्रोत्सव अंतर्गत १५ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून ललिता सहस्रनाम कुंकुमार्चन कार्यक्रम भक्तिभावाने आणि उत्साहात झाला. सारसनगर, औसरकर मळा येथे झालेल्या या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. देवीच्या नामस्मरणाने आणि धार्मिक विधींनी नवरात्रोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली.



शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. नवरात्रातील प्रत्येक दिवसाला धार्मिक महत्त्व असून, ललिता पंचमीच्या दिवशी देवी ललितेची विशेष पूजा-अर्चा केली जाते. याच पार्श्वभूमीवर श्री रामदेव भक्त मंडळाच्या वतीने ललिता सहस्रनाम कुंकुमार्चन या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी धार्मिक विधींनी झाली. ललिता सहस्रनामाचे पठण करीत देवीची भक्तिभावाने पूजा करण्यात आली. कुंकुमार्चनाच्या माध्यमातून देवीच्या चरणी श्रद्धा अर्पण करण्यात आली. देवीच्या नामाचा गजर, मंत्रोच्चार आणि पूजाविधींमुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. भाविकांनी श्रद्धेने या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदवून देवीचे आशीर्वाद घेतले. श्री रामदेव भक्त मंडळाच्या वतीने दरवर्षी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना देवीची आराधना करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जात आहे.

नवरात्रोत्सवासाठी नरेंद्र फिरोदिया व फिरोदिया परिवार यांचे योगदान लाभले आहे. तसेच आशिष, अजय व रमेश पोखरणा व परिवार, सौ. इंदुमती, अतुल व अभय पारख व परिवार यांचे सहकार्य लाभले आहे. विशेष योगदानासाठी गौरव फिरोदिया, छायाताई फिरोदिया परिवार यांचाही सहभाग आहे.

# कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष, पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ध्यास; न्याय, कुटुंबांना आधार; संतोष लांडे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य

**रोजगारापासून शिक्षणापर्यंत साथ; अहिल्यानगर कामगार संघटनेची सामाजिक बांधिलकी; सन १९९७ पासून स्व. अरुणकाका जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेचे काम सुरू**





नगर – कामगारांना योग्य मोबदला, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबांचे जीवनमान उंचावणे आणि कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, हा अहिल्यानगर कामगार संघटनेच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, रोजगार, वेतनवाढ, शैक्षणिक मदत आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून कामगार व त्यांच्या कुटुंबांना आधार देण्याचे काम केले जात आहे.

अहिल्यानगर कामगार संघटनेची स्थापना जुलै १९९७ मध्ये अहिल्यानगर येथील युनि क्लिंगर लिमिटेड कंपनीमध्ये झाली. सन १९९७ पासून स्व. अरुणकाका जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेचे काम सुरू होते. सन २०१७ मध्ये स्व. माजी आमदार अरुणकाका जगताप आणि आमदार संग्राम जगताप यांनी संघटनेच्या कार्याची जबाबदारी संतोष लांडे यांच्याकडे सोपवली. त्यानंतर संतोष लांडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या प्रश्नांवर काम करण्यासह संघटनेच्या सामाजिक उपक्रमांनाही महत्त्व देण्यात आले. आज अहिल्यानगरमधील अनेक कंपन्यांमध्ये ही संघटना कार्यरत आहे.



संघटनेच्या माध्यमातून अनेक तरुणांना कायमस्वरूपी नोकरीत समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. कंपनीतील कामगारांच्या वेतनवाढीबाबतचे करारनामे यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले आहेत. कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा, त्यांना सुरक्षित कामाचे वातावरण उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी संघटनेकडून सातत्याने पाठपुरावा केला जातो.

कामगारांच्या समस्या आणि मागण्यांबाबत व्यवस्थापन तसेच संबंधित संस्थांशी संवाद साधून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. कामगारांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या अडचणींच्या काळात त्यांना आधार देणे आणि त्यांच्या कुटुंबांच्या हिताचे निर्णय व्हावेत, यासाठी संघटना कार्यरत आहे.

कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या गुणवत्तेचा गौरव व्हावा, या उद्देशाने संघटनेच्या वतीने दरवर्षी 'कामगार पाल्य गुणगौरव सोहळा' आयोजित केला जातो. या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहित केले जाते.

तसेच गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी संघटनेच्या माध्यमातून आणि संतोष लांडे यांच्या वतीने स्वीकारली जाते. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, त्यांना शिक्षणाच्या संधी मिळाव्यात आणि त्यांनी उज्ज्वल भविष्य घडवावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो.

कामगारांच्या प्रश्नांसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यावरही संघटनेकडून भर दिला जातो. अनाथाश्रमातील बालकांसाठी अन्नदान करणे, बालघर प्रकल्पाच्या ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविणे थोर पुरुषांच्या जयंती साजरी करणे आणि दरवर्षी वृक्षारोपण करणे, अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न केला जातो.

कंपनीतील ज्येष्ठ कामगार सेवानिवृत्त झाल्यानंतर संघटनेच्या वतीने त्यांचा योग्य सन्मान करून निरोप समारंभ आयोजित केला जातो. कामगारांनी अनेक वर्षे केलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

कामगार प्रतिनिधी आजिनाथ शेवाळे यांनी संघटनेच्या कार्याविषयी भावना व्यक्त करताना सांगितले की, कोणताही वैयक्तिक स्वार्थ न ठेवता कामगारांसाठी लढणारे नेतृत्व आम्हाला मिळाले, हे आम्ही आमचे भाग्य समजतो. कामगारांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी संतोष लांडे कायम प्रयत्नशील असतात. त्यांच्या नेतृत्वामुळे कामगारांमध्ये एकजूट निर्माण झाली असून, आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढण्याची प्रेरणा मिळाली आहे.

कामगारांना योग्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण आणि न्याय मिळावा, यासाठी संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना संतोष लांडे यांनी कामगारांच्या समस्यांवर सातत्याने आवाज उठवला आहे. व्यवस्थापन आणि संबंधित संस्थांशी संवाद साधून कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. कामगारांच्या सुख-दुःखात भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना पाठिंबा देण्याचे काम लांडे करतात. त्यांचे सामाजिक कार्य आणि कामगारांसाठीचे योगदान निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना कामगार प्रतिनिधींनी व्यक्त केली.

# मेहेरबाबांच्या नवजीवन यात्रेला १६ ऑक्टोबर रोजी ७७ वर्षे पूर्ण



नगर – अवतार मेहेरबाबांनी १६ ऑक्टोबर १९४९ रोजी नवजीवन यात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी आपली सर्व संपत्ती दुसऱ्याचा नावावर केली, स्वतासह सोबतच्या २० शिष्यांना हि आपली सर्व चल-अचल संपती काहीही स्वताजवळ ठेवली नाही त्याला या १६ ऑक्टोबरला ७७ वर्षे पूर्ण होत आहे अशी माहिती डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली

कलचुरी पुढे म्हणाले श्रमयुक्त जीवन, ध्यानधारणा, भिक्षा मागून खाणे व भटकंती अश्या असाह्य, पूर्ण आशा रहित जीवन, देवाच्या भरवश्यावर जगणे त्यांनी २ वर्ष जगले. शेवटी बनारसला आपल्या जवळील सर्व सामान वाटून टाकले व जीवनाचे चार प्रतिक म्हणून पांढरा घोडा-शांतीचे प्रतिक, कष्टाचे प्रतीक-गाढव, सहन शक्तीचे प्रतीक-उंट व त्यागाचे प्रतिक-गाय हे चार प्राणी आपल्या पदयात्रेत घेतले.

बाबांनी नवजीवन प्रवासात मेहेरबाबा ईश्वर तत्त्वाची कवचकुंडले बाजूला सारून एखाद्या साधका प्रमाणे साधे निर्हेतुक जीवन जगत होते. आयुष्यात येणाऱ्या सर्व आपत्तींना तोंड देण्याची त्यांची सिद्धता होती. नवजीवनात सर्वसंग परित्याग करून म्हणजे आपल्यापुरते का होईना घरादारावर तुळशीपत्र ठेवून, नातेसंबंध तोडून, इच्छा वासनांना तिलांजली देऊन अगदी संन्यस्त वृत्तीने जगत होते. नवजीवन पर्वात भिक्षा मागून गुजराण त्यांनी व त्याच्या बरोबरील २१ सदस्यांनी केली.

कधी पायी, बैलगाडी, ट्रेन मधून त्यांनी २ वर्षे प्रवास केला. आज इथे, तर उद्या तिथे असे भटके जीवन जगत, भूमीचे अंथरूण आकाशाचे पांघरूण, वेळप्रसंगी उघड्यावर झोपण्याची तयारी ठेवा, असे त्यांनी सांगितले. खिशात एक पैसाही बाळगता निराधार जीवन जगणे हा या प्रवासाचा उद्देश होता

१६ ऑक्टोबर १९४९ रोजी मेहेरबाबांनी नवजीवनात प्रवेश केला. या जीवनात त्यांनी आपल्या 'मी ईश्वर आहे' या जाणिवेचा त्याग करून सर्वसाधारण साधकाची भूमिका स्वीकारली. सर्वच नातेसंबंध, वनसंपत्तीचा त्याग केला, भौतिक आणि आध्यात्मिक अशा सर्वच आशा-अपेक्षांना तिलांजली देऊन केवळ ईश्वरावर सर्वस्व बहाल करून साधकाने आपले जीवन कसे व्यतीत करावे. याचा जिवंत वस्तुपाठ जगासमोर ठेवला. माधुकरी मागत भटक्या जीवनात व्यतीत केला अंतर्गत अध्यात्म विश्व आणि बाहेरचे मायावी जग यांचा दुवा असणाऱ्या मनाचा नाश म्हणजेच 'मनोनाश' संपन्न करून या 'नवजीवनाची' सांगता झाली.



भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त एमआयडीसी उद्योजक ग्रुप श्रीराम चौक रिक्षा स्टाफ यांच्या वतीने सावेडी उपनगरातील विक्रेत्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विश्वनाथ पोंदे, संजय आव्हाड, प्रवीण घुंगार्डे, गणेश गांधी, संजय गोरे, विजय मते, अरुण भडांगे, सुनील गटणे, विलास रासकर, दत्ता मारा उपस्थित होते.

# कष्टाची कदर करून त्यांचा आदर करणे कर्तव्यच

**विश्वनाथ पोंदे यांचे प्रतिपादन; वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान करून दिन साजरा**

नगर – ३६५ दिवसांमधून ४ ते ५ दिवस सुट्ट्या वगळता दररोज नित्यनियमाने पहाटेपासून सकाळी येणारे दैनिकासह सायंकाळ चे दैनिकांचे वाटप करून ऊन, पाऊस, थंडी, वारा याची तमा न बाळगता परिश्रम करणारे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कष्टाची कदर करून त्यांचा केवळ आजच्या दिवशी आदर न करता रोजच त्यांच्या कार्याला सन्मानाची जोड देणे हे कर्तव्यच असते, असे प्रतिपादन एमआयडीसी येथील उद्योजक ग्रुपचे विश्वनाथ पोंदे यांनी केले.

१५ ऑक्टोबर भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त सावेडी उपनगरातील वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान अहिल्यानगर येथील एमआयडीसी उद्योजक ग्रुप व श्रीराम चौक रिक्षा स्टॉप यांच्यावतीने करण्यात आला. यावेळी उद्योजक विश्वनाथ पोंदे, वाहतूक सेना शहर प्रमुख संजय आव्हाड, प्रवीण घुंगार्डे, दिनेश कुलकर्णी, संजय लावंड, अण्णा चांदकोटी, दीपक खुडे, बाळासाहेब भुजबळ, अरुण ताटी उपस्थित होते.

वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष गणेश गांधी, उपाध्यक्ष संजय गोरे, प्रसिद्धीप्रमुख विजय मते, दत्ता मारा, सुनील गटणे, अरुण भडांगे, विलास रासकर, प्रत्युम गटणे आदी विक्रेत्यांचा ग्रुपच्या वतीने गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी गणेश गांधी यांनी सत्काराला उत्तर देताना वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अडचणी सांगून त्यांच्या कष्टाबद्दल, परिश्रमाची कदर वाचक करतात, विक्रेता व वाचक यांचे जिव्हाळ्याचे नाते असल्याने हा व्यवसाय आज पर्यंत टिकून आहे. याचे आम्हाला समाधान वाटते.

एमआयडीसी उद्योजक ग्रुप व श्रीराम चौक रिक्षा स्टाफ यांनी आमचा जो सन्मान केला, आमच्याविषयी जी कृतज्ञता दाखविली, प्रेम व्यक्त केले याबद्दल विजय मते यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरमध्ये नवरात्रौत्सवनिमित हिंदु युवक-युवतींच्या संरक्षणासाठी 'हर घर योद्धा' शौर्य प्रशिक्षण शिबीर

नगर – हिंदु जनजागृती समितीच्या वतीने हिंदु युवक-युवतींसाठी स्वसंरक्षण आणि धर्मशिक्षण देणाऱ्या 'हर घर योद्धा – शौर्य प्रशिक्षण शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नवरात्र शौर्याने गाजवूया, या संकल्पनेतून हे शिबिर घेतले जात आहे.




शिबिरात काय शिकवले जाणार? – १. लाठी-काठी युद्ध कला, २. नानचाकू, ३. मिक्स मार्शल आर्ट, ४. धर्मशिक्षण. या शिबिरातून युवक-युवतींना स्वसंरक्षणासोबतच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा उद्देश असल्याचे जास्तीत जास्त संख्येने या शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन समिती तर्फे करण्यात आले आहे.

हे शिबीर ११ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत १) मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा, नेप्ती नाका, अहिल्यानगर. वेळ : सायंकाळी ६ ते ७.३० वाजेपर्यंत., २) श्री दत्त मंदिर, शास्त्रीनगर, केडगाव, अहिल्यानगर वेळ: साय ७ ते ८.३० संपर्क : ८३२९३०२९५५ येथे होईल. या प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरू असून QR कोड स्कॅन करून नोंदणी करता येणार आहे. हिंदू युवक-युवतींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, इच्छुक युवक युवतींनी https://forms.gle/W6DYHFNpfMDGvPWy9 या लिंक वर क्लिक करून नोंदणी करणे आवाहन हिंदु जनजागृती समितीने केले आहे. रामेश्वर भुकन, हिंदु जनजागृती समिती करिता. संपर्क :- ८३२९३०२९५५

# 'पेशवाई श्रीमंत'चा सातवा वर्धापन दिन उत्साहात

**'सौ. भाग्यवती' कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद; संदीप पाटील यांच्या सूत्रसंचालनाने रंगला खेळ, गाणी आणि गप्पांचा आनंदमेळा**

नगर – 'पेशवाई श्रीमंत' या वस्त्रदालनाचा सातवा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सात वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करून आठव्या वर्षात पदार्पण करताना दालनाच्या वतीने महिलांसाठी 'सौ. भाग्यवती – ताल आणि खेळ, सख्यांचा आनंदाचा सुवर्णमेळ' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद लाभला.



'पेशवाई श्रीमंत' या वस्त्रदालनाच्या वर्धापन दिन कार्यक्रमामध्ये सौ. धनश्री सुजय विखे पाटील आदी.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी राहुल दत्तात्रय येमुल, सौ. धनश्री सुजय विखे पाटील, सौ. शितलताई जगताप उपस्थित होते.

सेलिब्रिटी अँकर आणि गायक संदीप पाटील यांच्या बहारदार सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमात सुरुवातीपासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विविध मनोरंजक खेळ, संगीत, गाणी आणि संवाद यांच्या माध्यमातून महिलांना आनंदाचे क्षण अनुभवता आले. स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. गाणी, गप्पा आणि नृत्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या अंतिम फेरीत साजी कमलाकर भाट, शिल्पा अंकम आणि जयश्री सोनवणे या तीन स्पर्धकांनी स्थान मिळवले. या अंतिम विजेत्यांना मानाची पैठणी देऊन गौरवण्यात आले.. तसेच कार्यक्रमाच्या समारोपावेळी कूपनच्या माध्यमातून उपस्थित प्रत्येक महिलेला भेटवस्तू देण्यात आली. मनोरंजनासोबतच महिलांना एकमेकींशी संवाद साधण्याची आणि मैत्रीचे बंध अधिक दृढ करण्याची संधी या कार्यक्रमातून मिळाली.

'पेशवाई श्रीमंत'ची पुणे आणि अहिल्यानगर येथे वस्त्रदालने असून, येथे पैठणी, पारंपरिक व डिझायनर साड्या, घागरे यांसह लग्नसमारंभासाठी विविध प्रकारचे पेहराव उपलब्ध आहेत. पुरुषांसाठी शेरवानी, जोधपुरी, कुर्ता-पायजमा आणि जॅकेट्स, तसेच ब्रँडेड रेडिमेड कपडे व कापड यांचा विशेष संग्रह हे या दालनाचे वैशिष्ट्य आहे. सण-उत्सव आणि बदलत्या फॅशननुसार नवनवीन कलेक्शन सादर करत ग्राहकांच्या आवडीनिवडी जपण्यावर दालनाचा भर असतो. सात वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आनंद साजरा करताना ग्राहकांनी दिलेले प्रेम, विश्वास आणि सहकार्य यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सोहळा ठरला. उत्कृष्ट नियोजन आणि महिलांच्या सहभागामुळे 'सौ. भाग्यवती' कार्यक्रमासह वर्धापन दिन सोहळा आनंददायी वातावरणात झाला.



स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने साई श्रद्धा फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा अर्चना चंद्रकांत परकाळे यांना 'आदर्श समाजसेविका' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

# अर्चना परकाळे यांचा 'आदर्श समाजसेविका' पुरस्काराने गौरव

नगर – स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने साई श्रद्धा फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा अर्चना चंद्रकांत परकाळे यांना 'आदर्श समाजसेविका' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, दुर्बल घटकांतील महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि गरजू महिला व युवतींना स्वावलंबनाची दिशा दाखविणे या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. फाऊंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय उत्कृष्ट गौरी आरास स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अर्चना परकाळे यांच्या महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या कार्याची दखल घेऊन स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने त्यांना आदर्श समाजसेविका पुरस्कार प्रदान करण्यात आला असल्याचे स्नेहबंध सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले.











# सथ्था कॉलनी येथून १८ ऑक्टोबर रोजी भव्यदिव्य जिनेश्वरी भक्ती यात्रेचे आयोजन

**हजारो भाविकांचा सहभाग, जिन शासन परंपरांचा जागर**



नगर - शहरातील आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासातील श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेव आराधनेनिमित्त १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता स्टेशन रोडवरील सथ्था कॉलनी येथून भव्यदिव्य जिनेश्वरी भक्ती यात्रा काढण्यात येणार आहे. यात्रेचा समारोप आनंद तीर्थ समवशरण येथे होईल.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात समर्पण चातुर्मासाची धार्मिक पर्वणी होत आहे. यात जिनेश्वरी भक्ती यात्रा आणि श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना सर्वांसाठी मोठी अध्यात्मिक पर्वणी आहे.

जिनेश्वरी भक्ती यात्रेतून जैन धर्माविषयी आध्यात्मिक जागृती, गुरु भक्ती आणि जिनवाणी (भगवान महावीरांची दिव्य वाणी) चा प्रचार-प्रसार करण्यात येईल. यात जिनेश्वरी डोक्यावर घेतलेले भाविक, शेकडो साधू साध्वीजी, जैन ध्वज, विविध देवता, राजा राणीच्या वेशभूषेतील मुकुटधारी महिला, पुरुष, श्रावक श्राविका, भगवान महावीरांचे संदेश असलेले फलक घेतलेले भाविक, प्रत्येक परिवारातील आबालवृद्ध सहभागी होणार आहेत. वाद्यांच्या गजरात ही यात्रा निघेल. यात्रा मार्गावर आकर्षक सजावट, सुशोभीकरण करण्यात येत आहे. संपूर्ण नगर शहरासाठी हा भव्य अध्यात्मिक सोहळा ठरेल.

जैन परंपरा, तीर्थंकर भगवान महावीर यांचे श्रुत ज्ञान प्रत्येकाला आत्म कल्याणाच्या मार्गावर नेणारे आहे. चांगले जीवन जगण्याची कला या ज्ञानातून आत्मसात होते. परिवारिक सुखाची दिशा गवसते. आनंदी राहण्याचा मंत्र मिळतो. जिनेश्वरी भक्ती यात्रेतून जैन दर्शन, कर्म सिद्धांत, विनय, संयम, मोक्ष मार्ग असे संदेश दिले जाणार आहेत. अहिल्यानगर शहरासाठी ही अतिभव्य यात्रा ऐतिहासिक ठरणार आहे. समग्र जैन विचार, परंपरांचे दर्शन यात्रेतून नगरकरांना होईल.

समर्पण चातुर्मासातील विविध धार्मिक कार्यक्रमांची नगरमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. नगरसह राज्यातील तसेच देशातील भाविक समर्पण चातुर्मासात गुरूदेवांचे दर्शन आणि मौलिक विचार ग्रहण करण्यासाठी येत आहेत. यात्रेत भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटी सदस्यांनी केले आहे. यात्रा प्रस्थानापूर्वी सर्वांसाठी सथ्था कॉलनी येथे नवकारशीची व्यवस्था करण्यात आली आहे.

## गुरुवाणी - ८१
## संग्रह करणे सोडा...



प्रत्येकाच्या आत एक समुद्र असतो. त्यात काही होण्याची कामना असते, त्याचा प्रवाह निरंतर चालू असतो. हे प्रवाह इतके असतात की आत्म्याची अनंत शक्ती एका एका प्रवाहात विभागून कमी कमी होते. कोटींची संपत्ती कोटी लोकांमध्ये वाटली तर कोणीच कोट्यधीश होणार नाही. तसेच आपल्या आत चालणारे विचार, विकल्प विभागले जाऊन आत फक्त समुद्राच्या लाटाच लाटा निर्माण होतात. लाटा कधी सकारात्मक, कधी नकारात्मक असतात. या चक्रातून तीर्थंकर परमात्मा बाहेर पडले आणि अनंत चक्षु झाले. विचार येणे धोकादायक नाही, पण ते पकडून ठेवणे धोकादायक असते. ज्यांची प्रज्ञा अश्वासारखी तेज गतीची असते, ते संग्रह करत करत नाहीत. ज्याची प्रज्ञा मंदगती असते तो संग्रह करत जातो आणि आतील समुद्रात वादळे येत राहतात. अशी वादळे आली की घाबरायला होते. आतमध्ये काही संग्रह नसेल तर ही परिस्थिती उद्भवत नाही. तीर्थंकरांकडे कोणी शहाणे गेले तर एक प्रश्न विचारला जायचा, मी शुक्लपक्षी आहे की कृष्णपक्षीय ? जर तुमच्यातील प्रेम, सहयोग वाढत असेल तर ते शुक्ल पक्ष, जर सहयोगाची भावना कमी होत असेल तर कृष्णपक्ष. अर्जुन मालीने जेव्हा दीक्षा घेतली तेव्हा त्याच्याकडे ज्ञान नव्हते, पण तो शुक्ल पक्षीय होता. त्याचे ज्ञान उत्तरोत्तर वाढतच गेले. शुक्ल पक्षीय बनण्याचा पुरूषार्थ केला पाहिजे. आपल्या आतील सहयोगची भावना, संयम वाढवला तर असंयम कमी कमी होत जाईल. क्रोध, शत्रुत्व वाढवले तर वाढतच जाते. कमी करत गेलात तर नक्कीच कमी होते. तुम्ही वर्तमानात काहीही असाल, पण तुम्ही काय वाढवताय आणि काय कमी करताय यावर तुमचे भविष्य ठरत असते. समुद्राचे पाणी कसे मोजायचे? अभयकुमार म्हणतात, समुद्रात येणारे पाणी थांबवले तर त्यातील पाणी मोजता येईल. संग्रह करणे सोडले पाहिजे. ज्यांनी संग्रह सोडला त्यांना स्वर्ग प्राप्ती झाली. घरात सून आल्यावर तिला स्वतः जिवंत असतानाच उत्तराधिकारी कराल तर स्वर्गात जाल. आपले मन हंसाप्रमाणे हवे ते नेहमी मोती वेचते. मन गिधाडासारखे असेल तर घाणच वेचेल. पाळीव प्राण्यांना खुले सोडले तर ते परत गोठ्यात येतात, एखाद्या पक्षाला आकाशात खुले सोडले तर तो परत येत नाही. हा फरक लक्षात घ्या. म्हणून आसक्ती, संग्रह सुटला तर भीतीही नाहिशी होईल.

**- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# ग्रामीण संस्कृतीचा भोंडला शाळा महाविद्यालयात झाला पाहिजे

**श्रीमती प्रमिला कुलकर्णी**



भिंगार - कृषीप्रधान असलेल्या आपल्या देशात ग्रामीण संस्कृतीचा भोंडला हा अविभाज्य भाग आहे. भोंडला हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून तो कुटुंब प्रबोधनाचे विद्यापीठ आहे. त्यामागे शास्त्र आहे. दुर्दैवाने भोंडला काळाच्या पडद्याआड चालला आहे. भोंडल्याचा कार्यक्रम शाळा-महाविद्यालयांसह सर्वत्र झाला पाहिजे असे स्त्री सखी महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती प्रमिला कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

आश्विन महिन्यात शरद ऋतूत, नवरात्रोत्सवात मुलींनी एकत्र येऊन संध्याकाळी पाटावर हत्तीची प्रतिमा काढून त्याभोवती फेर धरून गाणी म्हणण्याचा हा उत्सव आहे. हत्ती हे सुबत्ता व वैभवाचे प्रतिक आहे.घरात धनधान्याची समृध्दी असते. मुलींना याकाळात शेतीची कामे नसत. भोंडला म्हणजे हस्त नक्षत्राची पूजा. म्हणूनच हत्तीची पूजा केली जाते. यात जमीन, हत्ती आणि मैत्रीची पूजा होते. रोज एक एक गाणी क्रमाक्रमाने चढत जातात. दहा किंवा सोळा दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात रोज वेगळी खिरापत असते ती मुलींनी ओळखायची असते. असा जीवन समृद्ध करणारा भोंडला नव्या पीढीला माहिती झाला पाहिजे यासाठी महिलांनी स्वतः हून पुढाकार घ्यावा असे आवाहन कुलकर्णी यांनी केले आहे.

भोंडल्याला कोकणात हादगा आणि विदर्भात भुलाबाई या नावाने ओळखले जाते. ही शतकानुशतके चालत आलेली प्राचीन कृषी परंपरा आहे.

या खेळात खगोलशास्त्र, स्त्री आरोग्यशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र दडले आहे. पूर्वी मुली शाळेत जात नव्हत्या, तेव्हा भोंडलाच त्यांची शाळा होती. यातूनच त्यांना जीवनाचे शिक्षण मिळत असे. त्या आनंदी असत. पारंपारिक गाण्यांनी भोंडल्याची सुरुवात होते

'ऐलमा पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडूनी करीन तुझी सेवा' या गाण्याने सुरुवात होते. यानंतर एक लिंबू झेलू बाई, कारल्याची बी, अक्कण माती चिक्कण माती, नणंद-भावजय, अडकित जाऊ खडकित जाऊ, खारिक खोबऱ्याची ही गाणी होतात. शेवटी भोंडला संपला दिवा लावला, आमचा खेळ पुरा झाला. या समापणाचे गाण्याने भोंडला संपतो.

या गाण्यांमधून संसार कसा करावा, चोरी करू नये, एकमेकींना सांभाळून घेणं, एकत्र येणं, निसर्गाची पूजा अशा गोष्टी शिकवल्या जातात.

म्हणूनच ही परंपरा शाळा-महाविद्यालयांत सर्वत्र सुरू झाली पाहिजे, जेणेकरून नव्या पिढीला हा महत्त्वाचा खेळ समजेल आणि चांगले संस्कार होतील असे त्या म्हणाल्या.

# कराटे स्पर्धेत सायली बडे हिला रौप्यपदक



नगर - अहिल्यानगर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या १०८ श्री महंत पंडित सुचासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी सायली संतोष बडे हिने कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. सायलीने १७ वर्षांखालील मुलींच्या ४९ किलो वजनगटातील कराटे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अंजली शिरसाठ यांनी तिचे अभिनंदन केले. क्रीडा शिक्षक महेंद्र थिटे यांचे सायलीला मार्गदर्शन लाभले


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली सदनिका मिळकत हि विद्यमान मालक **पुनीत प्रमोद सोनी, मधु प्रमोद सोनी व सुमित प्रमोद सोनी रा.माळीवाडा ता. नगर जि.अहिल्यानगर** यांची आहे तरी सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की सदर सदनिका मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, इक्वीटेबल मॉरगेज, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर सदनिका मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजले जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अ.नगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे नालेगाव येथील **सर्व्हे नं. ४६/२ मधील प्लॉट नं. १४२/१४३/१४४/१४५ याचे क्षेत्र ९७८.00 चौ.मी. यावर बांधलेल्या आदर्श रेसिडेन्सी या अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं. २०५ चे बिल्टअप क्षेत्रफळ ५४.७५ चौ.मी.,बाल्कणी एरिया ६.६७ चौ.मी. लाईट मीटर,नळ कनेक्शनसह या सदनिका मिळकतीबाबत.**

| **यांसी चतु:सिमा-प्लॉट** | **यांसी चतु:सिमा- प्लॅट** |
|---|---|
| पुर्वेस : ६.00 मी. रुंदीचा रस्ता, | पुर्वेस : ओपन टु स्काय, |
| दक्षिणेस : ९.00 मी.रुंदीचा रस्ता, | दक्षिणेस : ओपन टु स्काय, |
| पश्चिमेस : रस्ता, | पश्चिमेस: प्लॅट नं. २०६, |
| उत्तरेस : प्लॉट नं. १४१. | उत्तरेस : ओपन टु स्काय. |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक सदनिका मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर दिनांक :- १५/१०/२०२६

**ॲड. अभिजीत बाळासाहेब आवारी**
ऑफीस नं. २, तळमजला, पराग बिल्डींग जिल्हाधिकारी
कार्यालयाशेजारी अहिल्यानगर मोनं. ९८८१२७१२२४,




सावेडी येथील महाराष्ट्र पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येथे घनकचरा व्यवस्थापन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# महाराष्ट्र पब्लिक स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम

नगर - स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने सावेडी येथील महाराष्ट्र पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येथे घनकचरा व्यवस्थापन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, ओला व सुका कचरा, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, '७ आर' संकल्पना तसेच कचऱ्याचा योग्य पुनर्वापर व पुनर्चक्रण याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेत स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता करण्यात आली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वच्छ शाळा, सुंदर परिसर आणि हरित भविष्य यांचा संदेश देण्यात आला. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य अंकुश दराडे, मुख्याध्यापिका हेमा कोंगे, सत्राच्या मार्गदर्शक सुवर्णा वाघ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# भाग्योदय विद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**तायक्वांदो, कुस्ती, गोळाफेक व हॅमर थ्रो स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश; संस्थेकडून अभिनंदन**



नगर - भाग्योदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन केले आहे. तायक्वांदो, कुस्ती, गोळाफेक व हॅमर थ्रो स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली असून, यशस्वी खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अहिल्यानगर शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत वैष्णवी बाजीराव लेहणे (इयत्ता नववी) आणि ज्ञानेश्वर गणेश शिंदे (इयत्ता सातवी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. यशराज रुपेश कांबळे (इयत्ता नववी) याने द्वितीय क्रमांक मिळविला. समर्थ विलास गायकवाड, बाळकृष्ण संदीप सातपुते (दोघेही इयत्ता नववी), तुषार सुदाम कावळे (इयत्ता अकरावी), विराज प्रकाश तांबडे (इयत्ता सातवी), चैतन्य राजू गुंजाळ आणि अवधूत आदिनाथ गुंजाळ (दोघेही इयत्ता सहावी) यांनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

कुस्ती स्पर्धेत साई भरत कांडेकर याने खुल्या गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर आशिष दीपक घाटविसावे (इयत्ता दहावी) याने ६५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच गोळाफेक व हॅमर थ्रो या मैदानी क्रीडा प्रकारांत श्रावणी कैलास टकले (इयत्ता अकरावी) हिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाचा गौरव वाढविला.

या खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडाशिक्षक सोपान तोडमल आणि प्रा. एकनाथ होले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने हे यश संपादन करता आले.

या यशाबद्दल प्राचार्य ज्ञानदेव बेरड, संस्थापक भानुदास कोतकर आणि सचिव सचिन कोतकर यांनी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट व त्यावरील बांधकाम मिळकत ही विद्यमान मालक **अनिल जॉन कोळगे रा.पुणे** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील सर्व्हे क्र. २५९/१ब/६/७/८ब मधील प्लॉट नं. १३३ याचे क्षेत्र १३२.३३ चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील असलेले संपूर्ण बांधकाम क्षेत्र ८८०.00 चौ फुट ही मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :-**

| | |
|---|---|
| पुर्वेस : ६ मी. रस्ता, | दक्षिणेस : प्लॉट नं. १३४, |
| पश्चिमेस : प्लॉट नंबर १३९, | उत्तरेस : प्लॉट नंबर १३२, |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर दिनांक :- १५/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- फ्लॅट नंबर ४, गुरुप्रसाद अपार्टमेंट,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर मो.नं. ९८६०६४६४६३


# ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर दिल्लीत तातडीने बैठक घेणार

**उसाला प्रतिटन ५००० रुपये भाव, साखरेचा एमएसपी ५० रुपये; इथेनॉल ७५ रु. लिटर आणि वजनकाटे ऑनलाईन करण्याच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा**



नगर - ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगासमोरील विविध अडचणी आणि मागण्यांसंदर्भात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या दालनात मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीला माजी मंत्री सदाभाऊ खोत, सहकार विभागाचे सचिव प्रविण दराडे, राज्य साखर आयुक्त संजय कोलते यांच्यासह शिवसेना शेतकरी सेनेचे प्रदेशअध्यक्ष प्रा. जालिंदर पाटील, किसान मोर्चा महाराष्ट्राचे सचिव भगवान काटे, शिवसेना पक्षाचे अहिल्यानगरचे अभिजीत अशोकराव पोटे, जय शिवराय किसान संघटनेचे अध्यक्ष शिवाजी माने, शिवसेना शेतकरी सेना महाराष्ट्राचे सचिव जनार्धन पाटील, शरद जोशी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष ज्ञानदेव पाटील, अहिल्यानगर शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे,संजय वाघ, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष महेश खराडे, जय शिवराय किसान संघटनेचे सदाशिव कुलकर्णी, जय शिवराय किसान संघटनाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील आदीसह शिष्टमंडळातील शेतकरी प्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उसाला प्रतिटन ५,००० रुपये भाव मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत ५० रुपये प्रति किलो करावी, तसेच इथेनॉलचा दर ७५ रुपये प्रति लिटर निश्चित करावा या मागण्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. याशिवाय साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाईन करून पारदर्शकता आणावी, या विषयावरही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले की, हे सर्व मुद्दे केंद्र सरकारशी संबंधित असल्याने स्वतः मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून आजच्या बैठकीला उपस्थित असलेल्या शिष्टमंडळातील शेतकरी प्रतिनिधींना सोबत घेऊन दिल्लीत तातडीने बैठक आयोजित केली जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृह व सहकार मंत्री अमित शाह, कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत ही संयुक्त बैठक घेऊन शेतकर्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्या खालील प्रमाणे की, साखरेची किंमत किमान ५० ते ५५ रुपये प्रति किलो करावी व दर द्विस्तरीय करावेत, तसेच इथेनॉलचा दर ७५ रुपये प्रति लिटर करावा. उसाला प्रतिटन ५,००० रुपये भाव मिळावा तसेच दुधाच्या फॅटप्रमाणे उसाचा दर ज्या त्या रिकव्हरीनुसार देण्यात यावा. शेतकरी आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त भागीदारीतून प्रत्येक जिल्ह्यात १० वजनकाटे उभारण्यात यावेत. या वजनकाट्यांवर केलेले वजन कायदेशीररीत्या ग्राह्य धरण्याचा कायदा करावा. दुष्काळी भाग वगळून महाराष्ट्रातील साखर कारखाने १५ नोव्हेंबरनंतरच सुरू करावेत, ज्यामुळे जास्त रिकव्हरी मिळून साखर उत्पादन वाढेल. उसासह सर्व शेतमालाचे दर ठरवताना वाढीव उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांच्या कुटुंब चरितार्थ खर्चाचा समावेश करण्यात यावा. दोन साखर कारखान्यांमधील अंतराची अट काढून टाकावी व वाहतूक अंतरांनुसार आकारणी करावी. साखर कारखान्यांचा ताळेबंद हिशोब आणि एफ.आर.पी. रिपोर्ट वेळेत सादर न करणार्या संचालक व कार्यकारी मंडळावर दंडात्मक कारवाई करून हा दंड त्यांच्या वैयक्तिक संपत्तीतून वसूल करावा अशी मागणी करण्यात आली यावेळी शरद जोशी विचार मंच, शिवसेना शेतकरी सेना, जय शिवराय किसान संघटना आणि शेतकरी-शेतमजूर संघटनांचे प्रमुख पदाधिकारी यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

सदर बैठकीसाठी शिवसेनेचे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, रघुनाथ दादा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अड अजित काळे मराठवाड्यातून योगेश ठाकरे, अतिश बेनाडे, रामदास दोरगे आदींसह शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

